CON 797

# महाराष्ट्र लोकसेवा आयोग

**महाराष्ट्र वित्त व लेखा सेवा, वर्ग-१ च्या अधिकाऱ्यांकरिता विभागीय परीक्षा**

मंगळवार, दिनांक २ जानेवारी २०१८

[ **वेळ** : सकाळी १०-०० ते दुपारी १-०० ]

(**एकूण गुण**-१००)

**पेपर क्रमांक १**

**प्रेसी ॲण्ड ड्राफ्टींग**

(पुस्तकांशिवाय)

**सूचना.**— (१) उत्तरपुस्तिकेच्या आतील भागात कोठेही उमेदवाराने बैठक क्रमांक, स्वतःचे किंवा इतरांचे नाव, पत्ता किंवा आपली ओळख देणारे चिन्ह नमूद करू नये अन्यथा तो शिक्षेस पात्र ठरेल.

(२) उमेदवाराने प्रत्येक प्रश्नातील उपप्रश्नांची उत्तरे एकत्र सोडवावयाची आहेत. प्रश्नातील एक उपप्रश्न एकीकडे व दुसरा दुसरीकडे (काही पृष्ठे सोडून वा अन्य प्रश्न सोडवून तद्नंतर) सोडवल्यास दुसरा दुर्लक्षित केला जाईल.

(३) प्रश्नांची उत्तरे **मराठी** वा **इंग्रजी** एकाच भाषेत लिहावयाची आहेत.

(४) सर्व प्रश्न **अनिवार्य** आहेत.

(५) प्रत्येक प्रश्नांचे **गुण** त्या त्या प्रश्नासमोर दर्शविले आहेत.

(६) या परीक्षेसाठी कोणतेही पाठ्यपुस्तक विहीत केलेले नाही.

**गुण**

**भाग – एक**

१. सर्व शासकीय कार्यालयात वापरण्यात येणाऱ्या संगणकीकृत प्रणाली जसे ग्रास, अर्थवाहिनी, निवृत्तिवेतन वाहिनी, सेतू ह्या नागरिकांसाठी सुविधा म्हणून उपयोगात येत असतात. त्यांच्या वापराबाबत कार्यालयाच्या नोटीस बोर्डावर लावावयाच्या ' नागरिकांना सूचना ' अशा प्रकारचे परिपत्रक तयार करा. २५

२. आपण आपल्या विभागाच्या मुख्यालयात कार्यरत आहात. कार्यालयीन कामकाज करताना करावयाची काटकसर व त्यावर उपाययोजना सुचवून त्याबाबत सर्व विभागीय कार्यालय व जिल्हा कार्यालयांना पाठवावयाचे परिपत्रक तयार करा. २५

**भाग – दोन**

३. खालील उताऱ्याचा एक तृतीयांश इतका सारांश तयार करून त्यास योग्य ते शीर्षक द्या :- ५०

आपण पाहिलेच आहे की, द्रष्ट्याचाच दृश्यावर अधिकार चालत असतो. द्रष्ट्यात परिवर्तन करा की दृश्यही बदलेल; स्वतःला शुद्ध करा म्हणजे जग आपोआप शुद्ध होईलच. ही एकच गोष्ट शिकविण्याची आज पूर्वीपेक्षा अधिक गरज आहे. आपण शेजाऱ्यांच्याच वागणुकीकडे अधिकाधिक लक्ष देऊ लागलो आहोत, आणि स्वतःच्या वागणुकीकडे मात्र आपण कमी लक्ष देत आहोत. आपण बदललो की जग बदलेलच; आपण शुद्ध झालो की जगही शुद्ध होईलच. प्रश्न असा आहे की इतरांमधील दोष मला का दिसावेत? याचे उत्तर हेच की मी जर सदोष नसेन तर मला इतरांमध्ये दोष दिसू शकणार नाही. मी स्वतः दुर्बल नसलो तर मी दुःखी होणार नाही. लहानपणी ज्या गोष्टीमुळे मला दुःख होत असे त्या गोष्टी आता मला दुःख देत नाहीत. वेदान्त म्हणतो की, "द्रष्ट्यात परिवर्तन झाले की दृश्यातही परिवर्तन होणे अपरिहार्यच असते."

ज्याला आत्मसंयम साधला आहे अशा माणसावर कोणतीच बाह्य वस्तू परिणाम करू शकणार नाही. त्याला मग आणखी कुणाच्या वा कशाच्या गुलामगिरीत खितपत पडावे लागणार नाही. त्याच्या मनाने स्वाधीनतापद प्राप्त केलेले असते - ते मुक्त होऊन गेलेले असते. केवळ अशीच व्यक्ती या संसारात वास करण्यास सर्वथा पात्र होय. या जगाविषयी

[ उलटून पहा

साधारणपणे लोकांची दोन मते असल्याचे आपल्याला आढळून येईल. काही लोक निराशावादी असतात. ते म्हणत असतात, " किती भयंकर, किती दुष्ट आणि किती वाईट जग हे! " तर दुसरे काही लोक आशावादी असतात, ते म्हणतात, " हे जग किती सुंदर, किती अदभूत आहे! " ज्यांनी आपल्या मनावर जय मिळविलेला नाही, त्यांच्या दृष्टीने जग हे दुःखाने पूर्ण, अथवा फारच झाले तर सुखदुःखमिश्रीत असेच ठरत असते. आपण ज्या वेळी स्वतःच्या मनावर प्रभूत्व मिळवू शकू त्या वेळी हेच आपले जग आपल्याला निर्भेळ सुखमय वाटू लागेल. त्यावेळी मग काहीही आपल्यावर चांगला अथवा वाईट परिणाम करू शकणार नाही. आपल्या दृष्टीला सर्वत्र व्यवस्थितपणा, सुसंबद्धता व एकसुत्रता आढळेल.

प्रेम, धर्म आणि पवित्रता ही आपल्या स्वतःच्या हृदयात जितकी वृद्धिंगत होतात, तितके आपल्याला बाहेर जास्त जास्त प्रेम, धर्म नि पवित्रता दिसू लागते. आपण दुसऱ्यांची जी सारी निंदा करतो, तिने वस्तुतः आपण स्वतःच निंदिले जात असतो. जगात जी काय खरीखरी प्रगती झाली आहे ती सारी प्रेमाच्या शक्तीनेच झाली आहे. दोष दाखवीत बसल्याने कधी कोणतेही चांगले काम केले गेलेले नाही. निंदेने, तिरस्काराने कधीच काही चांगले होत नाही.

आम्ही कशाचे अधिकारी आहोत आणि आम्ही कोणती वस्तू ग्रहण करून आत्मसात करू शकू, ह्याचा निर्णय आमचे कर्मच करील. आपल्या वर्तमान अवस्थेला आपण स्वतःच जबाबदार आहोत, आणि पुढे जे काय होण्याची आपली इच्छा आहे ते होण्याची शक्ती देखील आपल्यात विद्यमान आहे.

ज्या गोष्टीला आपण पात्र असतो तीच आपल्याला मिळत असते. अभिमान टाकून ही गोष्ट आपण समजून घेतली पाहिजे की दुःख काही अकारण भोगावे लागत नाही. कोणावरही निष्कारण आघात झालेले नसतात. स्वतःच्या हातांनी मार्ग तयार केल्याशिवाय कोणतेही अनिष्ट आपल्यावर कोसळत नाही. आपण हे जाणून घेतले पाहिजे. आपण आपल्या जीवनाचे पृथक्करण केले तर आपल्याला असे आढळून येईल की आपल्यावर जेव्हा केव्हा आघात झाला त्याचे कारण हे की आपण स्वतःच त्याची पूर्वतयारी केली होती. अर्धी कामगिरी आपण स्वतः करतो व उरलेली अर्धी बाह्य जग करते, आणि अशा रीतीने आपल्यावर आघात होतो. हे जर आपल्याला कळले तर आपले मन शांत होईल. त्याचप्रमाणे या विश्लेषणापासून आपल्या आशेचा एक संदेश मिळेल. तो असा : बाह्य जगतावर माझा ताबा नाही. परंतु जे माझ्या आत आहे, जे माझ्या अधिक निकट आहे, जे माझे अंतर्गत् आहे त्यावर माझा ताबा आहे. अपयशासाठी या दोहोंनी एकत्र येणे जर जरूर असेल, माझ्यावर आघात करण्यासाठी या दोघांची युती जर आवश्यक असेल, तर जी गोष्ट माझ्या ताब्यात आहे ती मी नियंत्रणात ठेवीन आणि तसे झाले तर आघात कसा होईल? मी माझे स्वतःचे जर खरोखर नियमन केले तर माझ्यावर कोणत्याही प्रकारचा आघात कधीही होणार नाही.

ज्यावेळी सगळीच्या सगळी जबाबदारी आपल्याच खांद्यावर पडते त्या वेळी आपण जितक्या उच्च आणि उत्कृष्ट रीतीने काम करू तितके आणखी इतर कोणत्याही परिस्थितीत करू शकणार नाही. मी तुम्हा सर्वांना आव्हान देतो - सांगा बघू मी एखादे तान्हे मूल तुमच्या हाती दिले तर तुम्ही कसे वागाल? तेवढ्या वेळेपुरते तुमचे सारे जीवन बदलून जाईल; एरवी तुम्ही कसेही असलात तरी निदान तात्पुरते तुम्हाला अगदी निःस्वार्थ होऊन जावे लागेल. तुमच्यावर सारी जबाबदारी टाकताच तुमच्या गुन्हेगारीच्या नि पापाच्या साऱ्या वृत्ती मालवतील - तुमची दानतच अजिबात बदलून जाईल. ह्याचप्रमाणे, जर सगळीच्या सगळी जबाबदारी आमच्याच खांद्यावर टाकण्यात आली तर आमच्या ठायीची सगळी श्रेष्ठता आणि सगळी उदात्तता पणास लागून व्यक्त होईल. ज्यावेळी आसरा घ्यायला आम्हाला कोणी उरणार नाही, ज्या वेळी आमचे दोष लादायला आम्हाला कोणी सापडणार नाही, ज्या वेळी आमचा भार वाहायला आम्हाला सगुण ईश्वर मिळणार नाही, ज्या वेळी केवळ आमचे आम्हीच साऱ्याला जबाबदार राहू त्याच वेळी आमच्यात जे काही उच्च आणि उदात्त आहे ते सारे प्रकट होईल. माझ्या दैवाला मीच जबाबदार आहे - माझे भले करणाराही मीच आहे, माझे बुरे करणाराही मीच आहे.

# MAHARASHTRA PUBLIC SERVICE COMMISSION

## DEPARTMENTAL EXAMINATION FOR MAHARSHTRA FINANCE AND ACCOUNT SERVICE, CLASS-I OFFICER'S

TUESDAY, 2nd JANUARY 2018

[Time—10-00 a.m. to 1-00 p.m.]

(Total Marks—100)

## PAPER I

## PRECISE AND DRAFTING

*(Without Books)*

*N. B.*— (1) Candidate should not wirte roll number, any name (including his/her own), signature, address or any indication of his/her identity anywhere inside the answer book otherwise he/she will be penalised.

(2) Candidates are expected to answer all the subquestions of a question together. If subquestion of a question is attempted elsewhere (after leaving a few pages or after attempting another question) the later subquestion shall be overlooked.

(3) Answers are to be written in one language only either in **Marathi** or in **English**.

(4) All questions are *compulsory*.

(5) The *marks* for each question are indicated in the margin.

(6) No textbook is prescribed for the examination.

**Marks**

### PART-I

1. Prepare a Circular to be put on the Office Notice Board under the caption 'Notice to Citizen' about the use of computerized systems such as GRAS, Arthavahini, Pensionvahini, Setu which are used in all the Government offices, for the benefit of citizens. 25

2. You are working at the Departmental Headquarter. Issue a Circular to all the divisional and district offices informing them to reduce/ cut Office Expenditure along with measures/steps to be taken for its implementation. 25

### PART-II

3. Summarize the following passage to about one-third of its length and suggest a suitable title :— 50

We have seen that it is the subjective world that rules the objective. Change the subject, and the object is bound to change; purify yourself, and the world is bound to be purified. This one thing requires to be taught now more than ever before. We are becoming more and more busy about our neighbours, and less and less about ourselves. The world will change if we change; if we are pure, the world will become pure. The question is why I should see evil in others. I cannot see evil unless I am evil. I cannot be miserable unless I am weak. Things that used to make me miserable when I was a child, do not do so now. The subject changed, so the object was bound to change; so says the Vedanta.

Thus the man who has practiced control over himself cannot be acted upon by anything outside; there is no more slavery for him.

[ *Turn over*

His mind has become free. Such a man alone is fit to live well in the world. We generally find men holding two opinions regarding the world. Some are pessimists and say, "How horrible this world is, how wicked!" Some others are optimists and say, "How beautiful this world is, how wonderful !" To those who have not controlled their own minds, the world is either full of evil or at best a mixture of good and evil. This very world will become to us an optimistic world when we become masters of our own minds. Nothing will then work upon us as good or evil; we shall find everything to be in its proper place, to be harmonious.

The more we grow in love and virtue and holiness, the more we see love and virtue and holiness outside. All condemnation of others really condemns ourselves. Every step that has been really gained in the world has been gained by love; criticizing can never do any good, it has been tried for thousands of years. Condemnation accomplishes nothing.

We are responsible for what we are; and whatever we wish ourselves to be, we have the power to make ourselves. If what we are now has been the result of our own past actions, it certainly follows that whatever we wish to be in future can be produced by our present actions; so we have to know how to act.

We get only that for which we are fitted. Let us give up our pride and understand this that never is misery undeserved. There never has been a blow undeserved; there never has been an evil for which I did not pave the way with my own hands. We ought to know that. Analyze yourselves and you will find that every blow you have received came to you because you prepared yourself for it. You did half, and the external world did the other half; that is how the blow came. That will sober us down. At the same time, from this very analysis will come a note of hope, and the note of hope is: "I have no control of the external world, but that which is in me and nearer unto me, my own world, is in my control. If the two together are required to make a failure, if the two together are necessary to give me a blow, I will not contribute the one which is in my keeping; and how then can the blow come? If I get real control of myself, the blow will never come."

Nothing makes us work so well at our best and highest as when all responsibility is thrown upon ourselves. I challenge every one of you. How will you behave if I put a little baby in your hands ? Your whole life will be changed for the moment; whatever you may be, you must become selfless for the time being. You will give up all your criminal ideas as soon as responsibility is thrown upon you—your whole character will change. So if the whole responsibility is thrown upon our own shoulders, we shall be at our highest and best; when we have nobody to grope towards, no devil to lay our blame upon, no Personal God to carry our burdens, when we are alone responsible, then we shall rise to our highest and best. I am responsible for my fate, I am the bringer of good unto myself, I am the bringer of evil.

CON 798

# महाराष्ट्र लोकसेवा आयोग

## महाराष्ट्र वित्त व लेखा सेवा, वर्ग-१ च्या अधिकाऱ्यांकरिता विभागीय परीक्षा

मंगळवार, दिनांक २ जानेवारी २०१८

[ **वेळ** : दुपारी २-३० ते सायंकाळी ५-३० ]

(**एकूण गुण**–१००)

**पेपर क्रमांक २**

## महाराष्ट्र सिव्हिल सर्व्हिसेस रुल्स

(पुस्तकांसह)

**सूचना.—** (१) उत्तरपुस्तिकेच्या आतील भागात कोठेही उमेदवाराने बैठक क्रमांक, स्वतःचे किंवा इतरांचे नाव, पत्ता किंवा आपली ओळख देणारे चिन्ह नमूद करू नये अन्यथा तो शिक्षेस पात्र ठरेल.

(२) उमेदवाराने प्रत्येक प्रश्नातील उपप्रश्नांची उत्तरे एकत्र सोडवावयाची आहेत. प्रश्नातील एक उपप्रश्न एकीकडे व दुसरा दुसरीकडे (काही पृष्ठे सोडून वा अन्य प्रश्न सोडवून तद्नंतर) सोडवल्यास दुसरा दुर्लक्षित केला जाईल.

(३) प्रश्नांची उत्तरे **मराठी** वा **इंग्रजी** एकाच भाषेत लिहावयाची आहेत.

(४) कोणतेही **पाच** प्रश्न सोडवावेत.

(५) प्रत्येक प्रश्नाचे **गुण** समासात दर्शविले आहेत.

**गुण**

१. सादरकर्ता अधिकाऱ्यांच्या कर्तव्यांचे व जबाबदाऱ्यांचे विवेचन सविस्तरपणे लिहा. २०

२. (अ) शासकीय कर्मचाऱ्याने वृत्तपत्रे, आकाशवाणी किंवा दूरदर्शनशी संपर्क ठेवण्याबाबतचे नियम कोणते आहेत ? १०

(ब) सेवानिवृत्तीनंतर शासनामध्ये पुनर्नियुक्त झालेल्या शासकीय कर्मचाऱ्यांना शासनाचे कोणकोणते लाभ देय ठरतात ? १०

३. स्वीयेत्तर सेवा म्हणजे काय ? स्वीयेत्तर सेवेमध्ये शासकीय कर्मचाऱ्याला प्राप्त होणारी प्रदाने, लाभ व त्यांनी पाळावयाची बंधने याबाबत सविस्तर चर्चा करा. २०

४. शासकीय कर्मचाऱ्यांचे सेवाभिलेख सुस्थितीत ठेवण्याबाबत कोणती दक्षता घेणे अभिप्रेत आहे ? २०

५. निवृत्तीवेतनाचे प्रकार कोणते ? सदर निवृत्तीवेतन लागू करताना कोणकोणत्या अटी-शर्ती पाळणे बंधनकारक आहे ? २०

६. टिपा लिहा :— २०

(अ) निलंबन

(ब) असाधारण रजा

(क) पदग्रहण अवधीची गणना

(ड) वित्तलब्धी

(इ) वैयक्तिक वेतन व विशेष वेतन यातील फरक.

[ उलटून पहा

# MAHARASHTRA PUBLIC SERVICE COMMISSION

## DEPARTMENTAL EXAMINATION FOR MAHARASHTRA FINANCE AND ACCOUNTS SERVICE, CLASS-I OFFICERS

TUESDAY, 2nd JANUARY 2018

[Time—2-30 p.m. to 5-30 p.m.]

(Full Marks—100)

## PAPER II

## MAHARASHTRA CIVIL SERVICES RULES

*(With Books)*

*N. B.*— (1) Candidate should not write roll number, any name (including his/her own), signature, address or any indication of his/her identity anywhere inside the answer book otherwise he/she will be penalised.

(2) Candidates are expected to answer all the subquestions of a question together. If subquestion of a question is attempted elsewhere (after leaving a few pages or after attempting another question) the later subquestion shall be overlooked.

(3) Answers are to be written in one language only either in **Marathi** or in **English**.

(4) Attempt any *five* questions.

(5) Marks for each question are indicated in the margin.

**Marks**

1. Explain in detail the duties and responsibilities of Presenting Officer. 20

2. (*a*) What are the rules for Government Servant to maintain contact with Press, Radio and Doordarshan. 10

   (*b*) What emoluments (benefits) are admissible to Government Servants, who are reappointed in Government Service after retirement ? 10

3. What do you meant by Deputation in Foreign Service ? What are the emolument received and restrictions to be followed, while in Deputation. 20

4. What precautions need to be taken to maintain the service record of Government Servant in good condition. 20

5. What are the types of Pension ? Explain the conditions to receive each of this type of Pension. 20

6. Write short notes :— 20

   (*a*) Suspension

   (*b*) Extra Ordinary Leave

   (*c*) Calculation of Joining Period

   (*d*) Emoluments

   (*e*) Difference between Personal Pay and Special Pay.

CON 799

# महाराष्ट्र लोकसेवा आयोग

**महाराष्ट्र वित्त व लेखा सेवा, वर्ग-एक अधिकाऱ्यांकरिता विभागीय परीक्षा**

बुधवार, दिनांक ३ जानेवारी २०१८

[ **वेळ** : सकाळी १०-०० ते दुपारी १-०० ]

(**एकूण गुण**–१००)

**पेपर क्रमांक ३**

**इंट्रोडक्शन टू इंडियन गव्हर्नमेंट अकाऊन्ट ॲण्ड ऑडिट, वगैरे**

(पुस्तकांशिवाय)

**सूचना.—** (१) उत्तरपुस्तिकेच्या आतील भागात कोठेही उमेदवाराने बैठक क्रमांक, स्वतःचे किंवा इतरांचे नाव, पत्ता किंवा आपली ओळख देणारे चिन्ह नमूद करू नये अन्यथा तो शिक्षेस पात्र ठरेल.

(२) उमेदवाराने प्रत्येक प्रश्नातील उपप्रश्नांची उत्तरे एकत्र सोडवावयाची आहेत. प्रश्नातील एक उपप्रश्न एकीकडे व दुसरा दुसरीकडे (काही पृष्ठे सोडून वा अन्य प्रश्न सोडवून तद्नतर) सोडवल्यास दुसरा दुर्लक्षित केला जाईल.

(३) प्रश्नांची उत्तरे **मराठी** वा **इंग्रजी** एकाच भाषेत लिहावयाची आहेत.

(४) कोणतेही **पाच** प्रश्न सोडवा.

(५) प्रत्येक प्रश्नाचे **गुण** समासात दर्शविण्यात आले आहेत.

(६) जादा सोडविलेले **प्रश्न** तपासले जाणार नाहीत.

**गुण**

१. थोडक्यात टिपा लिहा (कोणत्याही **चार**) :— २०

(अ) कोषागार निरीक्षण

(ब) आकस्मिकता निधी

(क) मोजमाप पुस्तिका

(ड) प्रशासकीय मान्यता व तांत्रिक मान्यता

(इ) तात्पुरते निवृत्तीवेतन

२. शासकीय लेखे व लेखापरीक्षण या संदर्भात भारताचे नियंत्रक व महालेखापरीक्षक यांचे अधिकार व कर्तव्ये याबाबत माहिती द्या. २०

३. (अ) कोषागाराचे दैनिक लेखे बंद करण्याबाबतची प्रक्रिया विशद करा. १०

(ब) "लेखापरीक्षण हे शासनासाठी वित्तीय नियंत्रणाचे साधन आहे" — चर्चा करा. १०

४. (अ) शासकीय लेख्यांच्या वर्गीकरणाचे उद्देश स्पष्ट करा. १०

(ब) सहाय्यक अनुदानाचे लेखापरीक्षण याबाबत महिती द्या. १०

५. (अ) लेखापरीक्षण अहवालात कोणत्या बाबी समाविष्ट असणे आवश्यक आहे. यावर चर्चा करा. १०

(ब) लोकलेखा समितीचे कार्य व कर्तव्ये याबाबत माहिती द्या. १०

६. (अ) "औचित्याचे लेखापरीक्षण" — चर्चा करा. १०

(ब) भांडाराच्या खरेदीचे लेखापरीक्षण करताना पहावयाचे मुद्दे कोणते ? १०

[ उलटून पहा

# MAHARASHTRA PUBLIC SERVICE COMMISSION

## DEPARTMENTAL EXAMINATION FOR MAHARASHTRA FINANCE AND ACCOUNTS SERVICES, CLASS-I OFFICER

WEDNESDAY, 3RD JANUARY 2018

[TIME—10-00 A.M. TO 1-00 P.M.]

(TOTAL MARKS—100)

## PAPER III

## INTRODUCTION TO INDIAN GOVERNMENT ACCOUNTS AND AUDIT, ETC.

*(Without Books)*

*N. B.*— (1) Candidate should not write roll number, any name (including his/her own), signature, address or any indication of his/her identity anywhere inside the answer book otherwise he/she will be penalised.

(2) Candidates are expected to answer all the subquestions of a question together, if subquestion of a question is attempted elsewhere (after leaving a few pages or after attempting another question) the later subquestion shall be overlooked.

(3) Answers are to be written in one language only either in **Marathi** or in **English.**

(4) Answers any *five* questions.

(5) The *marks* of each question are indicated in the margin.

(6) Extra attempted questions will not be assessed.

**Marks**

1. Write short notes (any *four*).— 20

   (*a*) Treasury Inspection

   (*b*) Contingency Fund

   (*c*) Measurement Book

   (*d*) Administrative Approval and Technical Approval

   (*e*) Provisional Pension.

2. What are the Powers and Duties of Comptroller and Auditor General of India regarding Government Accounts and Audit. 20

3. (*a*) Explain process of daily closing of a State Treasury. 10

   (*b*) "Audit is an Aid of Financial Control for Government" - Discuss. 10

4. (*a*) Give the Principles of Classification of Governments Accounts. 10

   (*b*) Give Information about Audit of Grant in Aid. 10

5. (*a*) Discuss about the points to which the Audit report draw attention. 10

   (*b*) State the Functions and Duties of Public Accounts Committee. 10

6. (*a*) Discuss on "Audit against Propriety" 10

   (*b*) Points to be seen while Audit of Purchase of Store. 10

# महाराष्ट्र लोकसेवा आयोग

**महाराष्ट्र वित्त व लेखा सेवा, वर्ग-१ अधिकाऱ्यांकरिता विभागीय परीक्षा**

बुधवार, दिनांक ३ जानेवारी २०१८

[ **वेळ** : दुपारी २-३० ते सायंकाळी ५-३० ]

(**एकूण गुण**-१००)

**पेपर क्रमांक ४**

## कमर्शियल बुक किपिंग

(पुस्तकांशिवाय)

**सूचना**.— (१) उत्तरपुस्तिकेच्या आतील भागात कोठेही उमेदवाराने बैठक क्रमांक, स्वतःचे किंवा इतरांचे नाव, पत्ता किंवा आपली ओळख देणारे चिन्ह नमूद करू नये अन्यथा तो शिक्षेस पात्र ठरेल.

(२) उमेदवाराने प्रत्येक प्रश्नातील उपप्रश्नांची उत्तरे एकत्र सोडवावयाची आहेत. प्रश्नातील एक उपप्रश्न एकीकडे व दुसरा दुसरीकडे (काही पृष्ठे सोडून वा अन्य प्रश्न सोडवून तद्नंतर) सोडवल्यास दुसरा दुर्लक्षित केला जाईल.

(३) प्रश्नांची उत्तरे **मराठी** वा **इंग्रजी** एकाच भाषेत लिहावयाची आहेत.

(४) कोणतेही **पाच** प्रश्न सोडवा.

(५) प्रश्न क्र. १ सोडविणे **आवश्यक** आहे.

(६) सर्व प्रश्नांना समान **गुण** आहेत.

**गुण**

१. मे. रमेश ट्रेडर्स यांचे ३१ मार्च २०१७ अखेर संपलेल्या वित्तीय वर्षाचे तेरीज विवरणपत्र पुढीलप्रमाणे आहे. सोबत दिलेल्या तरतुदी विचारात घेऊन ३१ मार्च २०१७ रोजी संपलेल्या वित्तीय वर्षाचे व्यापारीपत्रक, नफा-तोटा पत्रक आणि ३१ मार्च २०१७ अखेरचे ताळेबंद तयार करा :— २०

मे. रमेश ट्रेडर्स तेरीज विवरण ३१ मार्च २०१७ :—

| विवरण | नावे बाकी (रुपये) | जमा बाकी (रुपये) |
|---|---|---|
| शिल्लक साठा दिनांक १ एप्रिल २०१६ | ५०,००० | ...... |
| माल खरेदी | ३,१०,००० | ...... |
| माल विक्री | ...... | ४,००,००० |
| रोख शिल्लक | २,१०० | ...... |
| बँक शिल्लक | १२,००० | ...... |
| श्री. रमेश यांचे भांडवल | ...... | २,८८,६०० |
| उचल खाते | ४,००० | ...... |
| भाडे व कर | ५,००० | ...... |
| पगार | ३२,००० | ...... |
| टपाल व तार | ११,५०० | ...... |
| विक्रेत्यांचे कमिशन | ३५,००० | ...... |
| विमा | ९,००० | ...... |
| उपस्कर व खिळण | २२,००० | ...... |
| जाहिरात | १७,००० | ...... |
| मुद्रण व लेखनसामग्री | ३,००० | ...... |
| मोटार वाहन | ४८,००० | ...... |
| बुडीत येणी | २,००० | ...... |
| रोख सूट | ४,००० | ...... |

[ उलटून पहा

गुण

| विवरण | नावे बाकी (रुपये) | जमा बाकी (रुपये) |
|---|---|---|
| सर्वसाधारण खर्च | १४,००० | ...... |
| आवक वाहतूक भाडे | २२,००० | ...... |
| जावक वाहतूक भाडे | १०,००० | ...... |
| मजूरी | २०,००० | ...... |
| विविध देणी | ...... | ४०,००० |
| विविध येणी | ९६,००० | ...... |
| एकूण... | ७,२८,६०० | ७,२८,६०० |

**तरतुदी व समायोजन.—**

(अ) अखेरचा शिल्लक साठा मूल्य रुपये १४,५००, दिनांक ३१ मार्च २०१७.

(ब) एकूण खरेदी केलेल्या मालांपैकी रुपये ५,००० चा माल श्री. रमेश यांनी वैयक्तिक वापरासाठी घेतला.

(क) एकूण खरेदी केलेल्या मालामध्ये रूपये १०,००० च्या उपस्कर (फर्निचर) खरेदीचा चुकून समावेश करण्यात आला.

(ड) विविध येणी रकमेंपैकी ५ टक्के रकमेची बुडीत येणी करिता तरतूद करा.

(इ) मोटार वाहनावर दर वर्ष दर शेकडा २५ टक्के दराने घसारा आकारा.

२. द्विनोंद हिशोब पद्धतीची मूल तत्त्वे स्पष्ट करा. तिचे लाभ कोणते ? विवेचन करा .— २०

३. थोडक्यात टिपा लिहा (कोणत्याही **चार**) :— २०

(अ) बँक ताळमेळ (ब) वचन चिठ्ठी

(क) ख्याति (ड) ताळेबंद

(इ) संस्थांचे विलीनीकरण (फ) उत्पन्न व खर्च खाते.

४. घसाराची व्याख्या सांगा. घसारा परिगणना करण्याची पद्धती विशद करा. २०

५. (अ) अधिकोष ताळमेळ पत्रकाची आवश्यकता का आहे ? ५

(ब) राख वही व बक पासबुकमधील शिलकेत तफावत पडण्याची कारण नमूद करा. ५

(क) संयुक्त उपक्रमाची व्याख्या लिहा व संयुक्त उपक्रमाची वैशिष्ट्ये स्पष्ट करा. १०

६. (अ) किरकोळ खर्च किंवा लघू रोकड पुस्तक म्हणजे काय ? त्याचा उद्देश स्पष्ट करा. ५

(ब) रोजकिर्द म्हणजे काय ? रोजकिर्द लिहिण्याच्या पद्धतीचे नमुन्यासहित वर्णन करा. ५

(क) सरासरी देय दिनांक याची व्याख्या लिहा. १०

कु. 'स' यांनी खालील चार वेगवेगळ्या तारखांना काढलेल्या हुंड्या कु. 'र' ने स्विकारलेल्या आहेत. त्यांची सरासरी देय दिनांक निश्चित करा.

| हुंडी काढल्याचा दिनांक | रक्कम (रुपये) | यानंतर देय कालावधी |
|---|---|---|
| २० जानेवारी २०१७ | ७,००० | ४ महिने |
| ५ फेब्रुवारी २०१७ | ५,००० | ३ महिने |
| १६ मार्च २०१७ | ९,००० | २ महिने |
| १० एप्रिल २०१७ | ४,००० | २ महिने |

## MAHARASHTRA PUBLIC SERVICE COMMISSION

## DEPARTMENTAL EXAMINATION FOR MAHARASHTRA FINANCE AND ACCOUNT SERVICE CLASS–I OFFICER'S EXAMINATION

WEDNESDAY, 3rd JANUARY 2018

[Time—2-30 p.m. to 5-30 p.m.]

(Total Marks—100)

### PAPER IV

### COMMERCIAL BOOK KEEPING

*(Without Books)*

*N. B.*— (1) Candidate should not write roll number, any name (including his/her own), signature, address or any indication of his/her identity anywhere inside the answer book otherwise he/she will be penalised.

(2) Candidates are expected to answer all the sub-questions of a question together. If sub-question of a question is attempted elsewhere (after leaving a few pages or after attempting another question) the later sub-question shall be overlooked.

(3) Answers are to be written in one language only either in **Marathi** or **in English.**

(4) Attempt any *five* questions.

(5) Question No. 1 is *compulsory.*

(6) All Questions carry equal marks.

**Marks**

1. The following is the Trial Balance of M/s. Ramesh Traders as on 31st March 2017, You are requested to prepare the Trading and Profit and loss account for the year ended 31st March 2017 and the Balance Sheet as on that date after making necessary adjustments. 20

M/s. Ramesh Traders Trial Balance as on 31st March 2017.

| Particulars | Debit (Rs.) | Credit (Rs.) |
|---|---|---|
| Opening stock as on 1st April 2016 | 50,000 | ...... |
| Purchases | 3,10,000 | ...... |
| Sales | ...... | 4,00,000 |
| Cash in Hand | 2,100 | ...... |
| Cash at Bank | 12,000 | ...... |
| Mr. Ramesh's Capital | ...... | 2,88,600 |
| Drawings | 4,000 | ...... |
| Rent and Taxes | 5,000 | ...... |
| Salaries | 32,000 | ...... |
| Postage and Telegram | 11,500 | ...... |
| Commission Paid to Salesmen | 35,000 | ...... |
| Insurance | 9,000 | ...... |
| Furniture and Fittings | 22,000 | ...... |
| Advertisement | 17,000 | ...... |
| Printing and Stationary | 3,000 | ...... |
| Motor Car | 48,000 | ...... |

[ *Turn over*

Marks

| Particulars | Debit (Rs.) | Credit (Rs.) |
|---|---|---|
| Bad Debts | 2,000 | ...... |
| Cash Discounts | 4,000 | ...... |
| General Expenses | 14,000 | ...... |
| Carriage Inward | 22,000 | ...... |
| Carriage Outward | 10,000 | ...... |
| Wages | 20,000 | ...... |
| Sundry Creditors | ...... | 40,000 |
| Sundry Debtors | 96,000 | ...... |
| Total . . | 7,28,600 | 7,28,600 |

**The following adjustments are to be made :—**

(*a*) Stock as on 31st March 2017 was valued at Rs. 14,500.

(*b*) Mr. Ramesh has taken out for personal use goods costing Rs. 5,000 out of purchases during the year.

(*c*) Furniture purchased for Rs. 10,000 was wrongly included in purchases.

(*d*) Provision for bad debts to be created for Sundry Debtors at 5%.

(*e*) Depriciate Motor Car by 25 % per annum.

2. Explain the Principles of Double Entry System. What are the Advantages of Double-Entry System ? Describe it ? 20

3. Define in brief (any *four*).— 20

(*a*) Bank Reconciliation (*b*) Promissory Note

(*c*) Goodwill (*d*) Balance Sheet

(*e*) Amalgamation of Firms (*f*) Income and Expenditure Account.

4. Define Depreciation. Explain in detail different methods of calculation of depreciation. 20

5. (*a*) Why is Bank Reconciliation essential ? 5

(*b*) Explain the reasons for the difference between the balance as shown in cash book and in bank pass book. 5

(*c*) State the definition of Joint Venture and give its features. 10

6. (*a*) What is Petty cash book ? Explain its purpose. 5

(*b*) What is Journal ? Explain the procedure of writing journal with its format. 5

(*c*) Define " Average Due Date. " 10

Miss 'R' had accepted several bills drawn by Miss 'S', due on different dates as given below :—

Calculate the Average Due date.

| Date of Bills Drawn | Amount (Rs.) | Due Period |
|---|---|---|
| 20th January 2017 | 7,000 | 4 Months |
| 5th February 2017 | 5,000 | 3 Months |
| 16th March 2017 | 9,000 | 2 Months |
| 10th April 2017 | 4,000 | 2 Months |

# महाराष्ट्र लोकसेवा आयोग

**महाराष्ट्र वित्त व लेखा सेवा, वर्ग-१ अधिकाऱ्यांकरिता विभागीय परिक्षा**

गुरूवार, दिनांक ४ जानेवारी २०१८

[ **वेळ** : सकाळी १०-०० ते दुपारी १-०० ]

(**एकूण गुण**–१००)

**पेपर क्रमांक ५**

**भारताचे संविधान**

(पुस्तकांशिवाय)

**सूचना.**— (१) उत्तरपुस्तिकेच्या आतील भागात कोठेही उमेदवाराने बैठक क्रमांक, स्वतःचे किंवा इतरांचे नाव, पत्ता किंवा आपली ओळख देणारे चिन्ह नमूद करू नये अन्यथा तो शिक्षेस पात्र ठरेल.

(२) उमेदवाराने प्रत्येक प्रश्नातील उपप्रश्नांची उत्तरे एकत्र सोडवावयाची आहेत. प्रश्नातील एक उपप्रश्न एकीकडे व दुसरा दुसरीकडे (काही पृष्ठे सोडून वा अन्य प्रश्न सोडवून तद्नंतर) सोडवल्यास दुसरा दुर्लक्षित केला जाईल.

(३) प्रश्नांची उत्तरे **मराठी** वा **इंग्रजी** एकाच भाषेत लिहावयाची आहेत.

(४) कोणतेही **पाच** प्रश्न सोडवा.

**गुण**

१. टिपा लिहा (कोणत्याही **चार**) :— २०

(अ) वार्षिक विवरणपत्र.

(ब) उप राष्ट्रपतीची निवडणूक.

(क) आर्थिक आणीबाणी.

(ड) भारताचा महा न्यायवादी.

(इ) एकत्रित निधी व लोक लेखे.

२. उच्च न्यायालयाचा सर्व न्यायालयांवर देखरेख करण्याचा अधिकार स्पष्ट करा. २०

३. " राज्यपालाचे वैधानिक अधिकार " यावर टिपणी लिहा. २०

४. लोकसेवा आयोगाची कार्ये विशद करा (संघ आणि राज्य लोकसेवा आयोग) २०

५. सर्वोच्च न्यायालयाचा विचार घेण्याचा राष्ट्रपतींचा अधिकार स्पष्ट करा. २०

६. अनुच्छेद - ३७० (जम्मू-काश्मीर राज्याबाबत अस्थायी तरतूद) बाबत सविस्तर टिपणी लिहा. २०

[ उलटून पहा

## MAHARASHTRA PUBLIC SERVICE COMMISSION

## MAHARASHTRA FINANCE AND ACCOUNT SERVICE CLASS-I OFFICER'S EXAMINATION

THURSDAY, 4TH JANUARY 2018

[TIME—10-00 A.M. TO 1-00 P.M.]

(FULL MARKS—100)

## PAPER V

## CONSTITUTION OF INDIA

*(Without Books)*

*N. B.*— (1) Candidate should not write roll number, any name (including his/her own), signature, address or any indication of his/her identity anywhere inside the answer book otherwise he/she will be penalised.

(2) Candidates are expected to answer all the subquestions of a question together. If subquestion of a question is attempted elsewhere (after leaving a few pages or after attempting another question) the later subquestion shall be overlooked.

(3) Answers are to be written in one language only either in **Marathi** or in **English**.

(4) Solve any *five* questions.

| | | Marks |
|---|---|---|
| 1. | Write short notes on (any *four*) :—<br>(*a*) Annual Financial Statement.<br>(*b*) Election of Vice President.<br>(*c*) Financial Emergency.<br>(*d*) Attorney-General for India.<br>(*e*) Consolidated funds and Public Accounts. | 20 |
| 2. | Explain power of Superintendence over all Courts by High Court. | 20 |
| 3. | Write note on " Legislative power of the Governor ". | 20 |
| 4. | Discuss the Functions of Public Service Commissions (Union and State Public Service Commission). | 20 |
| 5. | Discuss " Power of President to consult Supreme Court. " | 20 |
| 6. | Write in detail on Article 370 (Temporary provisions with respect to the state of Jammu and Kashmir). | 20 |

CON 802

# महाराष्ट्र लोकसेवा आयोग

**महाराष्ट्र वित्त व लेखा सेवा, वर्ग-१ अधिकाऱ्यांकरिता विभागीय परीक्षा**

गुरुवार, दिनांक ४ जानेवारी २०१८

[ **वेळ** : दुपारी २-३० ते सायंकाळी ५-३० ]

(**एकूण गुण**–१००)

**पेपर क्रमांक ६**

**बॉम्बे फायनान्शियल रूल्स, महाराष्ट्र ट्रेझरी रूल्स इत्यादी**

(पुस्तकांसह)

**सूचना**.— (१) उत्तरपुस्तिकेच्या आतील भागात कोठेही उमेदवाराने बैठक क्रमांक, स्वतःचे किंवा इतरांचे नाव, पत्ता किंवा आपली ओळख देणारे चिन्ह नमूद करू नये अन्यथा तो शिक्षेस पात्र ठरेल.

(२) उमेदवाराने प्रत्येक प्रश्नातील उपप्रश्नांची उत्तरे एकत्र सोडवावयाची आहेत. प्रश्नातील एक उपप्रश्न एकीकडे व दुसरा दुसरीकडे (काही पृष्ठे सोडून वा अन्य प्रश्न सोडवून तद्नंतर) सोडवल्यास दुसरा दुर्लक्षित केला जाईल.

(३) प्रश्नांची उत्तरे **मराठी** वा **इंग्रजी** एकाच भाषेत लिहावयाची आहेत.

(४) कोणत्याही **पाच** प्रश्नांची उत्तरे लिहा.

(५) प्रत्येक प्रश्नाचे **गुण** समासात दर्शविण्यात आले आहेत.

(६) प्राधिकाराची केवळ नक्कल केल्यास **गुण** दिले जाणार नाहीत.

(७) जास्तीच्या उत्तरांना गुण दिले जाणार नाहीत.

**गुण**

१. थोडक्यात टिपा लिहा (कोणत्याही **चार**) :— २०

(अ) चुकांची दुरूस्ती ज्ञापन

(ब) व्यपगत ठेवी व त्यांचे प्रदान

(क) अर्थसंकल्पिय अनियमितता

(ड) खाते बदल नोंदवही

(इ) नामनिर्देशन.

२. आकस्मिक खर्चाच्या बाबतीत नियंत्रक अधिकारी आणि आहरण व संवितरण अधिकारी यांच्या जबाबदाऱ्या व कर्तव्ये स्पष्ट करा. २०

३. फरक स्पष्ट करा (कोणतेही **चार**) :— २०

(अ) भांडवली खर्च व महसुली खर्च

(ब) एकत्रित निधी आणि आकस्मिकता निधी

(क) फी व मानधन

(ड) आकस्मिक खर्चाचे संक्षिप्त देयक व तपशीलवार देयक

(इ) भारित खर्च व दत्तमत खर्च.

[ उलटून पहा

गुण

४. शासकीय कर्मचाऱ्यांनी केलेली लबाडी किंवा दुर्लक्ष यामुळे शासनाच्या झालेल्या हानीची जबाबदारी निश्चित करण्याविषयी कार्यपद्धती स्पष्ट करा. २०

५. (अ) शासकीय कर्मचाऱ्यास देण्यात यावयाच्या अग्रिमाचे प्रकार कोणते ? अशी अग्रिम देण्याविषयी सर्वसाधारण तत्त्व कोणती ? १०

(ब) भविष्यनिर्वाह निधीतून ना-परतावा अग्रिमाशी संबंधित तरतुदी स्पष्ट करा. १०

६. (अ) कोषागारात सादर करण्यात आलेल्या बिलाचे प्रदानास मंजुरी देण्यापूर्वी कोषागार अधिकारी यांनी कोणत्या प्रमुख बाबी पहाणे आवश्यक आहे. १०

(ब) एखादे बिल कोषागारात सादर करण्यापूर्वी हरवले / गहाळ झाले तर आहरण व संवितरण अधिकाऱ्याने कोणती कार्यवाही करावी ? १०

# MAHARASHTRA PUBLIC SERVICE COMMISSION

## DEPARTMENTAL EXMINATION FOR MAHARASHTRA FINANCE AND ACCOUNT SERVICE CLASS-I OFFICERS

THURSDAY, 4th JANUARY 2018

[Time—2-30 p.m. to 5-30 p.m.]

(Total Marks—100)

## PAPER VI

## BOMBAY FINANCIAL RULES, MAHARASHTRA TREASURY RULES ETC.

*(With Books)*

*N. B.*— (1) Candidate should not write roll number, any name (including his/her own), signature, address or any indication of his/her identity anywhere inside the answer book otherwise he/she will be penalised.

(2) Candidates are expected to answer all the subquestions of a question together. If subquestion of a question is attempted elsewhere (after leaving a few pages or after attempting another question) the later subquestion shall be overlooked.

(3) Answers are to be written in one language only either in **Marathi** or in **English**.

(4) Answers any *five* question.

(5) The *marks* for each question are indicated in the *margin.*

(6) Indiscriminate copying of an authority will be discounted.

(7) No marks will be alloted in excess of specified number of questions.

**Marks**

1. Write short notes (any *four*) :— 20

(*a*) Note of error.

(*b*) Lapsed deposit and their payments.

(*c*) Budgetory irregularities.

(*d*) Transfer Entry Book.

(*e*) Nomination.

2. What are the duties and responsibilities of Controlling Officer and Drawing and Disbursing Officer in respect of contingent expenditure. 20

3. Differentiate between (any *four*) :— 20

(*a*) Capital and Revenue Expenditure.

(*b*) Consolidated fund and Contingency fund.

(*c*) Fees and Honararium.

(*d*) Abstract contingency bill and detailed contingency bill.

(*e*) Charged and Voted expenditure.

[ *Turn Over*

Marks

4. State the general rules for enforcement of responsibility for losses sustained by Government through fraud or negligence of Government Servant. 20

5. (*a*) What are different types of advances given to government employees ? What are general guidelines for giving advances ? 10

(*b*) Explain in brief the provisions regarding non-refundable advance from G. P. F. 10

6. (*a*) State what are the major points to be seen by the Treasury Officer before bill is passed for payment. 10

(*b*) State what Drawing and Disbursing officer should do if bill passed by Drawing Officer / Controlling Officer is lost before presenting it at the treasury. 10

CON 803

# महाराष्ट्र लोकसेवा आयोग

**महाराष्ट्र फायनान्स ॲण्ड अकाऊन्टस सर्व्हिस वर्ग-१ अधिकाऱ्यांकरिता विभागीय परीक्षा**

शुक्रवार, दिनांक ५ जानेवारी २०१८

[ **वेळ** : सकाळी १०-०० ते दुपारी १-०० ]

(**एकूण गुण**–१००)

**पेपर क्रमांक ७**

**अकाऊन्टस कोड, भाग-१ इत्यादि**

(पुस्तकांसह)

**सूचना.—** (१) कोणतेही **पाच** प्रश्न सोडवा.
(२) प्रत्येक प्रश्नाचे समान **गुण** आहेत.
(३) उत्तराच्या समर्थनार्थ प्राधिकार नमूद करणे.
(४) तंतोतंत पुस्तकातून नक्कल करून लिहिल्यास **गुण** कमी होईल.
(५) उत्तरपुस्तिकेच्या आतील भागात कोठेही उमेदवाराने बैठक क्रमांक, स्वतःचे किंवा इतरांचे नाव, पत्ता किंवा आपली ओळख देणारे चिन्ह नमूद करू नये अन्यथा तो शिक्षेस पात्र ठरेल.
(६) उमेदवाराने प्रत्येक प्रश्नातील उपप्रश्नांची उत्तरे एकत्र सोडवावयाची आहेत. प्रश्नातील एक उपप्रश्न एकीकडे व दुसरा दुसरीकडे (काही पृष्ठे सोडून वा अन्य प्रश्न सोडवून तद्नंतर) सोडवल्यास दुसरा दुर्लक्षित केला जाईल.
(७) प्रश्नांची उत्तरे **मराठी** वा **इंग्रजी** एकाच भाषेत लिहावयाची आहेत.

**गुण**

१. थोडक्यात टिपा लिहा (कोणत्याही **चार**) :— २०

(अ) संग्रह खाते वही.
(ब) मोजमाप नोंद वही.
(क) प्रोफार्मा लेखे.
(ड) इसारा (बयाणा) रक्कम.
(इ) निलंबन लेखा.

२. जिल्हा परिषदेच्या मुख्य लेखा व वित्त अधिकाऱ्याचे कर्तव्य व जबाबदाऱ्या यांचे सविस्तर स्पष्टीकरण करा. २०

३. सार्वजनिक बांधकामाच्या लेख्याच्या पद्धतीचे मुख्य वैशिष्ट्ये विशद करा. २०

४. भांडवली व महसूल खर्चाच्या वाटपाचे सर्वसाधारण तत्त्वे विशद करा. २०

५. थोडक्यात वर्णन करा :—

(अ) जिल्हा परिषदेची आर्थिक वर्षाचा जमा-खर्चाच्या लेख्याचे विवरणपत्र तयार करून प्रसिद्ध करण्याची पद्धती सांगा. १०

(ब) लेखन सामुग्री खरेदी करण्यासाठी कोणत्या पद्धतीचा अवलंब करावा ? १०

६. थोडक्यात वर्णन करा :—

(अ) लेख्याचे संकलन म्हणजे काय ? जिल्हा परिषदेतील वित्त विभागात पंचायत समिती व विविध विभागाकडून येणाऱ्या लेख्याची संकलन व नोंदवण्याची पद्धतीचे वर्णन करा. १०

(ब) जिल्हा परिषद / पंचायत समितीच्या ठेवीचे प्रकार लिहा व ठेवी परत करण्याची पद्धत विशद करा. १०

[ उलटून पहा

# MAHARASHTRA PUBLIC SERVICE COMMISSION

## DEPARTMENTAL EXAMINATION FOR MAHARASHTRA FINANCE AND ACCOUNT SERVICE CLASS-I OFFICERS

FRIDAY, 5th JANUARY 2018

[Time—10-00 a.m. to 1-00 p.m.]

(Full Marks—100)

## PAPER VII

## ACCOUNTS CODE, PART-I ETC.

*(With Books)*

*N. B.*— (1) Answers any *five* questions.

(2) Marks are indicated in the right side of the *margin* for each question.

(3) Quote authority in support of your answer.

(4) Marks will be deducted for indiscriminate copying.

(5) Candidate should not write roll number, any name (including his/her own), signature, address or any indication of his/her identity anywhere inside the answer book otherwise he/she will be penalised.

(6) Candidates are expected to answer all the subquestions of a question together. If subquestion of a question is attempted elsewhere (after leaving a few pages or after attempting another question) the later subquestion shall be overlooked.

(7) Answers are to be written in one language only either in **Marathi** or in **English.**

**Marks**

1. Write short notes (any *four*) :— 20

(*a*) Stock Ledger.
(*b*) Measurement Book.
(*c*) Proforma Accounts.
(*d*) Earnest Money.
(*e*) Suspence Account.

2. Explain in detail, what are the duties and functions of the Chief Accounts and Finance Officer of the Zilla Parishad ? 20

3. What are the features of the system of Public Works Accounts ? 20

4. What are the general principles of allocation of expenditure between capital and revenue ? 20

5. Describe in short :—

(*a*) Preparation of the statement of accounts of receipt and expenditure of Zilla Parished and write down the method to publish it. 10

(*b*) Procedure for purchasing stationary. 10

6. (*a*) What is mean by compilation of accounts ? Describe the method of compilation from Panchayat Samiti and all Departments to Finance Department in Zilla Parishad ? 10

(*b*) Write down the kinds of deposits of Parishad / Panchayat Samiti and describe the kinds of returns such deposits. 10

CON 804

# महाराष्ट्र लोकसेवा आयोग

**महाराष्ट्र वित्त व लेखा सेवा, वर्ग-एक अधिकाऱ्यांकरिता विभागीय परीक्षा**

शुक्रवार, दिनांक ५ जानेवारी २०१८

[**वेळ** : दुपारी २-३० ते सायंकाळी ५-३०]

(**एकूण गुण**–१००)

**पेपर क्रमांक ८**

**महाराष्ट्र जिल्हा परिषद आणि पंचायत समिती ॲक्ट, १९६१, वगैरे**

(पुस्तकांसह)

**सूचना.**— (१) उत्तरपुस्तिकेच्या आतील भागात कोठेही उमेदवाराने बैठक क्रमांक, स्वतःचे किंवा इतरांचे नाव, पत्ता किंवा आपली ओळख देणारे चिन्ह नमूद करू नये अन्यथा तो शिक्षेस पात्र ठरेल.

(२) उमेदवाराने प्रत्येक प्रश्नातील उपप्रश्नांची उत्तरे एकत्र सोडवावयाची आहेत. प्रश्नातील एक उपप्रश्न एकीकडे व दुसरा दुसरीकडे (काही पृष्ठे सोडून वा अन्य प्रश्न सोडवून तद्नंतर) सोडवल्यास दुसरा दुर्लक्षित केला जाईल.

(३) प्रश्नांची उत्तरे **मराठी** वा **इंग्रजी** एकाच भाषेत लिहावयाची आहेत.

**गुण**

१. लेखापरिक्षण अहवालामध्ये समाविष्ट करावयाच्या तपशीलवार बाबींचे विवेचन करा. २०

२. ग्रामीण भागातील एखाद्या ठरावीक क्षेत्रातील मुलांना सक्तिचे प्राथमिक शिक्षण देण्यासाठी करावयाच्या योजनेची तयारी व अंमलबजावणी संदर्भात सखोल माहिती द्या. २०

३. जिल्हा परिषदेमार्फत स्थापित करण्यात येत असलेल्या विविध समित्यांची नावे नमूद करून, स्थायी समितीची रचना व वित्त समितीचे अधिकार व कार्ये नमूद करा. २०

४. मुंबई स्थानिक निधी लेखा परिक्षण अधिनियम, १९३० अन्वये आयुक्तांचे अधिकार स्पष्ट करा. २०

५. खालीलपैकी कोणत्याही **दोन** प्रश्नांची उत्तरे द्या (प्रत्येकी १० गुण) :— २०

(अ) ग्रामसभेबद्दल माहिती द्या.

(ब) सार्वजनिक जागेवरील अतिक्रमणाबाबत ग्रामपंचायत कायद्यामधील तरतुदी स्पष्ट करा.

(क) ग्रामपंचायतीचा लेखा परिक्षण अहवाल प्राप्त झाल्यावर ग्रामपंचायत कायद्यानुसार करावयाची कार्यवाही विशद करा.

[उलटून पहा

## MAHARASHTRA PUBLIC SERVICE COMMISSION

## DEPARTMENTAL EXAMINATION FOR MAHARASHTRA FINANCE AND ACCOUNTS SERVICE CLASS-I OFFICER'S

FRIDAY, 5TH JANUARY 2018

[TIME—2-30 P.M. TO 5-30 P.M.]

(TOTAL MARKS—100)

## PAPER VIII

## MAHARASHTRA ZILLA PARISHADS AND PANCHAYAT SAMITI'S ACT, 1961, ETC.

*(With Books)*

*N. B.*— (1) Candidate should not write roll number, any name (including his/her own), signature, address or any indication of his/her identity anywhere inside the answer book otherwise he/she will be penalised.

(2) Candidates are expected to answer all the subquestions of a question together. If subquestion of a question is attempted elsewhere (after leaving a few pages or after attempting another question) the later subquestion shall be overlooked.

(3) Answers are to be written in one language only either in **Marathi** or in **English.**

**Marks**

1. Explain the nature of details to be reported in the Audit Report. 20

2. Discuss in detail about the preparation and enforcement of scheme for compulsory education to the children in the area of compulsion of rural area. 20

3. Name the committees appointed by the Zilla Parishad. Explain the constitution of Standing Committee and powers and functions of Finance Committee. 20

4. Explain the powers of Commissioner as per the Bombay Local Fund Audit Act, 1930. 20

5. Attempt any *two* questions from the following (10 Marks each) :— 20

(*a*) Give the information about Gram Sabha.

(*b*) Explain the provisions in the Village Panchayat Act about encroachment on the public places.

(*c*) Write the action to be taken after receipt of audit note of the Grampanchayat as per Village Panchayat Act.